नागपूर
# महासागर वृत्तसागर
■ मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ ■

# नागपूर मनपा निवडणूकीत अपक्षांना मिळाले वेगवेगळे चिन्ह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

नागपूर -महापालिका निवडणुकीसाठी खऱ्या अर्थाने आता प्रचाराची मोहीम जोरात सुरु झाली आहे. शहरात राजकीय वतुर्ळात स्पर्धा वाढत असून, आज शनिवारी अपक्ष उमेदवारांना अधिकृत निवडणूक चिन्हांचे वाटप पूर्ण झाल्याने आता त्यांच्यासमोर प्रचारासाठी सर्व प्रकारच्या अडथळ्यांचे निधन झाले आहे. त्यामुळे रॅली, सभासदं, पदयात्रा, घराघर भेट देणे आणि सोशल मिडीयाच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा जलद गतीने प्रयत्न सुरू आहेत. काही उमेदवारांकडे पतंग, काहींना टॉर्च, तर काहींना ट्रक, हेल्मेट, चावी, ऑटो, केतली, गॅस सिलिंडर, सफरचंद, कप-बशी, मेणबत्ती अशी विविध चिन्हे दिली गेली आहेत.

भाजप, काँग्रेस, बसपा, शिवसेना (दोन्ही गट), मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट आणि अजित पवार गट), तसेच आम आदमी पक्षाचे अधिकृत उमेदवार आधीच प्रचारात धडकले होते. मात्र, निवडणूक चिन्ह मिळाल्यानंतर आता अपक्ष उमेदवारही मैदानात पूर्ण ताकदीने उतरत आहेत. काही उमेदवारांनी शनिवारी दुपारीच प्रचाराला सुरुवात केली आहे.

पतंग, टॉर्च, ट्रक, नारळ, मेणबत्ती, सिलिंग फॅन, हिरा, सूर्यफूल, एअर कंडिशनर, पुस्तक, टोपली, पाटी अशा विविध चिन्हांनी अपक्ष उमेदवारांनी आपले मतदारांशी संपर्क वाढवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तर प्रमुख पक्षांचे चिन्हे जसे की कमळ, पंजा, तुतारी, मशाल, घड्याळ, रेल्वे इंजिन, धनुष्यबाण, हत्ती आणि सायकल हे मतदारांमध्ये परिचित आहेत.

१५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, प्रचारासाठी उमेदवारांना १३ जानेवारी सायंकाळपर्यंतची मुदत मिळाली आहे. म्हणजे आता जवळजवळ १० दिवसांपर्यंत उमेदवार प्रचाराला लागणार आहेत. यंदाच्या निवडणुकीत ९९२ उमेदवार मैदानात असून, कालपर्यंत ३०२ उमेदवारांनी माघार घेतल्याने अनेक प्रभागांत सरळ सामना होण्याची शक्यता आहे, परंतु अनेक प्रभागांमध्ये तिरंगी, चौकटी लढती रंगणार आहेत.

काँग्रेस आणि भाजपसाठी ही निवडणूक फारशी सोपी नाही कारण दोन्ही पक्षांत बंडखोर उमेदवारांनी वेगवेगळ्या रितीने हल्लाबोल सुरू केला आहे. तिकीट न मिळाल्याने नाराज उमेदवार अपक्ष म्हणून उतरले असून, काही बंडखोरांनी विरोधी पक्षांमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अधिकृत उमेदवारांच्या यशासाठी ही परिस्थिती आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे.

बंडखोर उमेदवारांव्यतिरिक्त, पक्षांतर्गत नाराजीही काँग्रेस आणि भाजपसाठी चिंतेची बाब ठरली आहे. तिकीट न मिळाल्याने किंवा स्थानिक पातळीवर दुर्लक्षित केल्यामुळे काही नेते आणि कार्यकर्ते प्रचारापासून दूर राहण्याचा निर्णय घेत आहेत. काही ठिकाणी त्यांनी नेतृत्वाला धमक्या दिल्याचेही वृत्त आहे. ही नाराजी खुल्या मैदानावर उमटत असल्यामुळे पक्षनेत्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. नाराज पक्षकऱ्यांना सामोरे जाणे ही मोठी परीक्षा आहे.

राजकीय पक्षांचे निरीक्षक आणि रणनीतिकार मागील निवडणुकीतील मतांच्या विश्लेषणावरून प्रभागनिहाय रणनीती आखण्यात गुंतले आहेत. कोणत्या भागात कोणत्या समाजघटकाचा प्रभाव आहे, कोणत्या उमेदवाराला कुठल्या क्षेत्रातून जास्त फायदा होऊ शकतो, याचा अभ्यास वेगाने सुरू आहे. यावरून प्रचाराचे कार्यक्रम आणि मुद्दे ठरवले जात आहेत. एकूणच, चिन्हांचे वाटप आणि उमेदवारांची अंतिम यादी स्पष्ट झाल्यामुळे आता नागपूर महापालिका निवडणुकीतील खरी स्पर्धा आणि राजकीय रणधुमाळी सुरू झाली आहे. पुढील काही दिवसांत आरोप-प्रत्यारोप, जोरदार प्रचार आणि मतदारांचे मन जिंकण्यासाठी कडक स्पर्धा पाहायला मिळणार आहे.

# पाणीटंचाई होऊ देणार नाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :




## आमदार डॉ.आशिष देशमुख यांचे निर्देश

सावनेर-कळमेश्वर तालुक्यातील सर्व गावांना नियमित व स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे, तसेच येणाऱ्या उन्हाळ्यात कोणत्याही गावाला पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, असे स्पष्ट निर्देश आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी दिले.

दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सावनेर तालुक्याची आढावा बैठक सावनेर पंचायत समिती येथे तसेच कळमेश्वर तालुक्याची आढावा बैठक कळमेश्वर पंचायत समिती येथे संपन्न झाली.

या बैठकीत सावनेर व कळमेश्वर या दोन्ही तालुक्यांतील प्रत्येक गावातील पाणीटंचाईच्या परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्या गावांमध्ये पाणीपुरवठ्याच्या स्त्रोतांची आवश्यकता आहे, त्या गावांकडून माहिती घेण्यात आली. हंडपंप, विहीर, नळयोजना आदी विविध मागण्यांची सविस्तर नोंद करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी सांगितले की, येणाऱ्या उन्हाळ्यात सावनेर-कळमेश्वर तालुक्यातील कोणत्याही गावाला दुष्काळ किंवा पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये. सर्व नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सरपंच, अधिकारी व संबंधित यंत्रणांनी योग्य व तातडीच्या उपाययोजना कराव्यात. यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, इच्छुक सरपंचांना महाराष्ट्रातील आदर्श गावांचा अभ्यास दौरा घडवून देण्यात येईल. भास्करराव पेरे, पोपटराव पवार यांच्या गावांप्रमाणे सावनेर-कळमेश्वर तालुक्यातही आदर्श गावे निर्माण करून सर्वांगीण विकास साधला जाईल, असेही आमदार डॉ. देशमुख यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीस राजीव पोतदार, मनोहर कुंभारे, अशोक धोटे, अशोक तांदुळकर, तहसीलदार अक्षय पोयाम, गट विकास अधिकारी हिरुडकर, तहसीलदार विकास बिक्कड, चंद्रशेखर लांडे, बाबा बुऱ्हान, प्रमोद पिंपळे, प्रिया मानकर, मीना तायवाडे, स्वप्नील चौधरी, शैलेंद्र अस्वले, संदीप उपाध्ये, दिलीप धोटे तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री गणेश मंदिर टेकडी येथे तीळी चतुर्थी कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :



नागपूरचे आराध्य दैवत असलेले व प्राचीन स्वयंभू श्री गणेश मंदिर टेकडी स्टेशन रोड, सिताबर्डी नागपूर येथे दरवर्षी पौषातील तीळी चतुर्थी मंगळवार दि.६ जानेवारीला येत असल्यामुळे अंगारक योग आहे त्यामुळे भक्तांची मोठया प्रमाणात गर्दी राहणार आहे.

विशेष आकर्षक रोषणाई करण्यात आली असून "श्री" ना आकर्षक सजावट पंकज अग्रवाल यांच्यातर्फे तर संस्थेतर्फे श्री" ना अंदाजे 750 किलो चांदीचे गर्भगृह तयार करण्यात आले आहे हे विशेष आकर्षण आहे. तसेच भक्तांकरीता 900 किलो गुळाच्या रेवडीचा प्रसाद वितरीत करण्यात येणार आहे. याप्रसंगी भक्तांना सुरळीत दर्शन व्हावे याकरीता 500 स्वयंसेवकांची मदत घेण्यात येणार आहे. तसेच 50 सुरक्षा कर्मचारी मंदिराकडून कार्यरत राहतील अशी माहिती पत्रकार परिषदेत बोलतांना श्रीराम कुळकर्णी यांनी दिली.

सकाळची मंगल महापूजा आरती अजय संचेती यांच्या हस्ते सकाळी 4 वा. होणार आहे. देवस्थाना तर्फे सर्व महिला भक्तांना त्यांनी मौल्यवान वस्तू सोबत बाळगू नये. अशी माहिती देण्यात आली. तीळी चतुर्थीला व्यवस्थेसंबंधी विविध समित्या कडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष श्रीराम कुळकर्णी यांनी दिली. त्यावेळी संस्थेचे सचिव दिलीप शहाकार ,अरूण व्यास, उपस्थित होते.

# महावितरणच्या गो-ग्रीन योजनेला वाढती पसंती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :




वीजबिलांच्या छापील कागदांचा वापर बंद करण्यासाठी महावितरणने सुरू केलेल्या 'गो-ग्रीन' योजनेला वीजग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या वर्षभरात नागपुर परिमंडलातील तब्बल 10 हजार 588 वीजग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला आहे.

वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडून शुक्रवार (दि. 2) पर्यंत नागपुर परिमंडलातील लघुदाब वर्गवारीतील पर्यावरणस्नेही 32 हजार 853 ग्राहक या योजनेत सहभागी झाले आहे व त्यांना 39 लाख 42 हजार 360 रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

गो-ग्रीन योजनेतील वीजग्राहकांचा वाढता प्रतिसाद सहभाग स्वागतार्ह आहे. त्यांना वीजबिल डिजिटल स्वरुपात पाठवले जात आहे. पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

गेल्या वर्षभरात 10 हजारांवर ग्राहकांचा सहभाग :वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला नागपूर परिमंडलात प्रतिसाद वाढत आहे. विशेष म्हणजे मागिल वर्षभरात 10 हजार 588 ग्राहकांची या योजनेत भर पडली आहे. यात नागपूर जिल्ह्यात 9 हजार 440 ग्राहकांचा तर वर्धा जिल्ह्यातील 1 हजार148 ग्राहकांचा समावेश आहे.

या योजनेत आतापर्यंत 32 हजार 853 पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना 39 लाख 42 हजार 360 रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये नागपूर जिल्ह्यातील 28 हजार 501 ग्राहकांना 34 लाख 20 हजार 120 तर वर्धा जिल्ह्यातील 4 हजार 352 ग्राहकांना 5 लाख 22 हजार 240 रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

असे व्हा योजनेत सहभागीः गो-ग्रीन योजनेसाठी महावितरणच्या या वेबसाइटवर किंवा मोबाईल ॲपवर नोंदणी करण्याची स्वतंत्र सोय उपलब्ध आहे. केवळ ग्राहक क्रमांक सबमीट करावे लागेल व छापील बिलाची प्रत रद्द करून संबंधितांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांक व इमेलवर दरमहा बिल पाठविण्यात येईल. नोंदणीकृत मोबाईल किंवा इमेल बदलण्याची सोय देखील त्याच ठिकाणी उपलब्ध आहे. वार्षिक 120 रूपयांचा फायदाः महावितरणकडून गो-ग्रीनचा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात 10 रुपये सवलत देण्यात येत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील 12 महिन्यांची म्हणजे 120 रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे.

# वाठोड्यात १.८० लाखाची घरफोडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

वाठोडा ठाण्यांतर्गत चोरांनी घरफोडी करून रोकड आणि दागिन्यांसह १ लाख ८० हजार रुपये किंमतीच्या मालावर हातसाफ केला. या प्रकरणी पोलिसांनी अमोल भास्कर मंदूरकर (३५) रा. न्यू गणेशनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. अमोल घराला कुलूप लावून कुटुंबासह साळभावाच्या घरी आयोजित कार्यक्रमासाठी हिंगणा येथे गेले होते. ही संधी साधून अज्ञात आरोपीने दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. रोख २० हजार आणि सोन्याचांदीचे दागिने असा १,८०,००० रुपयांचा माल चोरून नेला.

## हिट ॲन्ड रनमध्ये वृद्धा ठार

**नागपूर :** शहरात दररोज हिट ॲन्ड रनच्या घटना पुढे येत आहेत. वाहन चालकांमुळे अनेकांना त्यांचा जीव गमवावा लागत आहे. प्रतापनगर ठाण्यांतर्गत हिट ॲन्ड रनची घटना पुढे आल्यानंतर आता वाडी ठाण्यांतर्गत एक वृद्ध महिला हिट ॲन्ड रनला बळी पडली. विमल रामदास मेश्राम (६९) रा. बक्षी लेआऊट, खडगाव रोड असे मृत वृद्धेचे नाव आहे. रविवारी दुपारी विमल घरी जेवण केल्यानंतर बाहेर फिरायला निघाल्या होत्या. अमरावती मार्गावर एमआयडीसी टी-पॉइंटवर अज्ञात वाहनाच्या चालकाने त्यांना मागून जबर धडक दिली.

# चाळा-तारणा मार्ग खड्डेमय
# वाहनचालक व नागरिक त्रस्त....

## तीन किलोमीटर रस्त्यातील प्रकार...

■ गजानन लांजेवार, कुही, दि. ५ :



चाळा ते पचखेडी तारणा मार्ग सध्या पूर्णतः खड्डेमय झाला असून जागोजागी अक्षरशा फुटलेला असल्याने जाणा येणाऱ्या प्रवाशांची अत्यंत दयनीय स्थिती बनली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यामुळे व जागोजागी रस्त्याची गिट्टी उघडी पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. फुटलेल्या रस्त्याने दुचाकी स्लिप होणे व पंचर होणे नेहमीचे झालेले आहे याला जबाबदार कोण? असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

कुही मुसळगाव चाळा पचखेडी तारणा हा मार्ग 16 किलोमीटरचा असून कुही तालुक्याचे ठिकाण असल्याने नागरिकांची कामानिमित्त दररोजची मोठ्या प्रमाणात वर्दळ या मार्गाने असते. हा मार्ग कुही पासून मुसळगाव पर्यंत अत्यंत चांगल्या प्रकारचा आहे. पुढे तो चाळ्यापर्यंत काही ठिकाणी फुटलेला असून मध्यभाग वर व दोन्ही साईडने दबलेल्या व काही ठिकाणी खड्डे पडलेल्या अवस्थेत आहे. परंतु चाळा ते पचखेडी हा तीन किलोमीटर रस्त्याची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. या रस्त्यावरून दररोज शेतकरी, नागरिक, शालेय विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात ये जा असते. रस्त्यावर पडलेल्या मोठ्या मोठ्या खड्ड्यामुळे दुचाकी स्वारासह चार चाकी वाहनांचे प्रचंड हाल होत असून, अपघाताचा धोका वाढलेला आहे. पावसाळ्यात तर खड्डे चुकवताना अनेक वेळा अपघाताच्या घटना समोर आल्या आहेत.

स्थानिक नागरिकांनी याबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभागाला वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे. अनेकदा या रस्त्या संदर्भात वर्तमानपत्रात बातम्या प्रकाशित झाल्या, त्याचा काहीच पाठपुरावा संबंधित विभागाने केला नाही. वेळेतच रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**प्रवाशांना जीव मुठीत घेऊन करावा लागतो प्रवास**

मुसळगाव बानोर चाळा हा पाच किलोमीटर रस्ता काही प्रमाणात फुटलेला आहे. व पुढे चाडा ते पचखेडी हा तीन किलोमीटरचा रस्ता जीवघेणा झाला असून या रस्त्याची अक्षरशः चाळण झाल्याने दररोज अपघाताची शक्यता बळावली आहे. अनेकदा किरकोळ अपघात सुद्धा झाले आहे. रात्री बेरात्री आरोग्याची समस्या उद्भवल्यास ग्रामीण रुग्णालय कुही या तालुक्याच्या ठिकाणी येण्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय या ग्रामीण भागातील गावांना नाही. या रस्त्याने शेतकरी नागरिक व शाळकरी विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याने, तातडीने रस्ता दुरुस्तीची मागणी जोर धरत आहे.

संबंधित विभागाला वारंवार तक्रार करून प्रत्यक्ष भेट घेऊनही आजपावेतो काहीही उपाययोजना केलेली नाही.
एखादी मोठी दुर्घटना घडल्यास विभागाचे डोळे उघडतील का? पावसाळ्यापूर्वी रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास जिल्हा परिषद नागपूर कार्यालय समोर निदर्शने करू.

**पराग तळेकर, सरपंच तारणा**

रात्री बेरात्री दवाखान्याचा प्रश्न उद्भवल्यास कुहीला जावे लागते. हया रस्त्याची फुटलेली खड्डेमय अवस्था असल्याने यातून त्रासदायक प्रवास करावा लागतो. वाहन चालवणे नाकी नऊ येते. जि. प. विभागाला वारंवार तक्रार करूनही काही उपयोग झालेला नाही. यानंतर आंदोलन करू.

**बंडूजी नरूले, सरपंच बानोर**



# माथनी टोल प्लाझा वर होत आहे लूट....

## नगराध्यक्ष प्रसन्ना तिडके यांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन

■ **महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. ५ :**

माथनी टोल प्लाझा सुरु झाला तेव्हा पासून फोरव्हिलर कार, फाईव्ह व्हीलर ऑटो, ट्रक यांची पास सुरु असतांना एनएचएआय कंपनीने टोल प्लाझा आपल्या अंडर मध्ये घेतला तेव्हा पासून शासनाने काढलेला जी आर बाजूला ठेऊन पासेस बंद केल्या व पैसे वसुल करणे सुरु केले. मौदा नवनियुक्त नगराध्यक्ष प्रसन्ना तिडके यांनी दखल घेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन दिले.



माथनी टोल प्लाझा सुरु झाला तेव्हा पासून वीस किलोमीटर अंतरावर असलेल्या वाहन धारकांना पास ची सुविधा सुरु होती. परंतु ऑक्टोबर २०२५ पासून एनएचएआय ह्या कंपनीने चार्ज घेतल्यानंतर सर्व पासेस बंद करून ग्रामीण जनतेकडून ओव्हरलोड चे पैसे वसुल करणे सुरु केले.

कार ची पास प्रति महिना पन्नास रुपये तर ट्रक ची पास प्रति महिना एक हजार रुपये होती ही ऑक्टोबर २०२५ सुरु असतांना सुद्धा टोल प्लाझा चा नियम धाब्यावर ठेवत एनएचएआय ने आपला नियम सुरु केला व प्रत्येक फेरीला फास्टॅग द्वारा पैसे वसुल करणे सुरु आहे त्यातच कोणताही नियम नसतांना ओव्हर लोड चे पैसे वसुल करणे सुरु आहे.

**ओव्हर लोडचे बेकारदेशीर वसुल...**

ओव्हर लोड वाहन असले कि टोल प्लाझा वर बॅरिकेट लावतात आणि वाहन अडवून त्यांच्या कडून जबरीने पैसे वसुल करतात. फास्टटॅग चे पैसे वसुल करतात त्यांच्या शिवाय टोल ओपन होत नाही. टोल ओपन होऊन सुद्धा ओव्हर लोड चे जोपर्यंत पैसे देत नाही तो पर्यंत बॅरिकेट लावून कर्मचारी वाहनासमोर उभे होतात.

दहा चक्का ट्रक चा ओव्हर लोड ची स्लिप देतात त्यावर टोल फी २४५, पेनाल्टी २४५ एकूण ४९० तर बारा चक्का ट्रक चा टोल फी ३५५, पेनाल्टी ३५५ एकूण ७१० वसुल करतात. त्यातच मोठे वाहन असल्यास त्यांच्या कडून जास्त पैसे वसुल करतात. वाहनाच्या फास्ट टॅग मधून अगोदरच पैसे वसुल करीत आहेत त्यातही हे ओव्हर लोड घेत आहेत. ओव्हरलोड चा वजन ०. ०० दाखवीत असतांना सुद्धा पैसे वसुल करणे सुरु आहे.

> एनएचएआय कंपनी के नियम से हम चार्ज ले रहे है. आपकी कोई भी पास नही चलेगी, फास्ट टॅग से चार्ज देके आपको जाना पडेगा, ओव्हर लोड भी पे करणा पडेगा...
>
> **यादव, माथनी टोल प्लाझा हेड**

> केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कडे मौदा व मौदा तहसील मधील कार, ट्रक वाहन धारकांना पूर्ववत पासेस सुरु करावी असे निवेदन दिले आहे. लवकरच बैठक बोलावून पासेस सुरु करण्याचे आस्वासन दिले आहे.
>
> **प्रसन्ना (राजाभाऊ)तिडके, नगराध्यक्ष नगरपंचायत मौदा**

# पाणीटंचाई जाणवणार नाही असे नियोजन करा : आ. मेघे




■ **महासागर प्रतिनिधी हिंगणा, दि. ५ :**

तालुक्याची पाणीटंचाई आढावा सभा पंचायत समितीच्या सभागृहात आज आमदार समीर मेघे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, तहसीलदार रुणय जक्कुलवार, माजी जिल्हा परिषद सदस्या उज्वला बोढारे,गटविकास अधिकारी(गट अ) संदीप गोळशलवार, महिला व बालविकास अधिकारी सुशांत गाडेवार,संजय गांधी निराधार समिती अध्यक्ष नरेंद्र वाघ, माजी प.स.सदस्य लीलाधर पटले, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाच्या सहायक अभियंता रिता रामटेके यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी हजर होते.

तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलनिहाय सर्व गावातील पाण्याचे नियोजन, संभाव्य पाणीटंचाई व त्यासाठी आतापासूनच उपाययोजना करण्यासंदर्भात सरपंच व ग्राम अधिकारी यांच्याशी थेट चर्चा करून विहिरी अधिग्रहण, विहिरी खोलीकरण, विंधनविहिरीचे फ्लॅशिंग करून दुरुस्ती, पाण्याची टाकी व पाईपलाईन दुरुस्ती याविषयी ठराव घेण्यात आले.

याशिवाय नंदिरा आणि कान्होली या गावात विशेष बाब म्हणून पाणीटंचाई चे प्रस्ताव दुसऱ्या निधीतून घेण्यासाठी प्रस्ताव देण्याचे निर्देश देण्यात आले. वडधामना, नागलवाडी, टाकळघाट, डिंगडोह -देवी, इसासनी सह काही गावात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या पाणीपुरवठा योजनाची कामे सुरू आहेत. कुठे त्या पूर्ण- अपूर्ण आहेत. याविषयी आढावा घेत असतांना एमजीपी चे कुणीही अधिकारी या सभेला उपस्थित नव्हते त्याबद्दल स्वतः आमदार महोदयांनी नाराजी व्यक्त केली.

तर जलजीवन मिशन अंतर्गत तालुक्यातील निम्म्या गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांची कामे रखडली आहेत हा विषय काही सरपंचांनी काढताच हा विषय बदलून च घ्या अशी भूमिका आमदारांसह सर्वांनी घेतली.

यावेळी आमदार मेघे यांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्राम पंचायत ला प्रमाणपत्र देऊन सरपंच व ग्राम अधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.

या सभेचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी संदीप गोळशलवार तर संचालन शिक्षण विस्तार अधिकारी शोभने यांनी केले. सभेला पंचायत विस्तार अधिकारी जीवन देशमुख, शेषराव चव्हाण, रमेश ढोक, गजेंद्र खोबे, विशाल भोसले,प्रवीण खाडे, तालुक्यातील सरपंच प्रमोद डाखळे, धीरज आंबटकर, उमेश आंबटकर, शारदा शिंगारे, पल्लवी कुकडकर, रुपेश झाडे, शेखर पिसे, कृष्णा ताडाम, रेणुका धामणे यांच्यासह ग्राम अधिकारी, उपसरपंच आणि संबंधित विभागाचे अधिकारी हजर होते.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात



■ **महासागर प्रतिनिधी वाडी, दि. ५ :**

फेटरी येथील सावित्रीबाई फुले विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व स्नेहसंमेलन शनिवारी ३ जानेवारी व रविवार ४ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रभाकराव बानाईत तर प्रमुख पाहूणे म्हणून फेटरीचे उपसरपंच मुकेश ढोमणे संस्थेचे सचिव वनिता बानाईत संस्थेचे सहसचिव शैलेश बानाईत, माजी मुख्याध्यापक विणाताई भड, दादाराव सहारे, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ नागपूर इमाम वाडा आगाचे वाहतूक निरीक्षक रोहित कछुआ, वाहतूक नियंत्रक विलास मते उपस्थित होते.

मुकेश ढोमणे यांनी सावित्रीबाई यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. प्रभाकर बानाईत यांनी सावित्रीबाई प्रमाणे शिकून सर्व मुलींनी समाजात आपले नावलौकिक करावे असे आव्हान केले. त्यानिमित्ताने एसएससी परीक्षा २०२५ मध्ये शाळेतून प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी कुमारी जानवी पवार ९०.४० टक्के तर द्वितीय क्रमांक जानवी खाडे ८९.४० टक्के यांना मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला तसेच सर्व विषयात सर्वाधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी विविध नृत्य, नाटक, नक्कल, पोवाडा, एकपात्री प्रयोग या माध्यमातून प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका शोभा बानाईत, संचालन स्वाती रडके व आभार सोनाली भड यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अलका पाटील, सुषमा सावरकर ऋतुजा माळोदे, साधना तिजारे, राजेंद्र घोंगे, शुभांगी खंडागळे, शशिकला धुर्वे, रंजना कोकाटे, बेबी फुले, डिशी बानाईत, कांता लसूंते, रंजना वाघाडे यांनी सहकार्य केले.

# सावित्रीबाई फुले जयंती साजरी



■ **महासागर प्रतिनिधी, कुही, दि. ५ :**

गट ग्राम पंचायत तारणा येथे भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या,भारतीय स्त्रीवादाच्या जननी, क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व दीपप्रज्वलीत करून अभिवादन करण्यात आले. सावित्रीबाई फुले ह्या पहिल्या महिला शिक्षिका असून महान समाजसेविका व स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या होत्या. असे अनेक विचार सरपंच पराग तळेकर यांनी व्यक्त केले. "घडली नसती मी जरी, शिकली नसती माझी माय, जर नसत्या सावित्रीबाई तर कशी शिकली असती माझी माय" अशे परखड मत यावेळी ग्रा.पं. अधिकारी शोभा भोजने यांनी मांडले.

कार्यक्रमाला सदस्य सुरज तांबे, पोलिस पाटील रिता गायकवाड, जि. प. शाळा मुख्याध्यापक बावनगडे सर, परिचारीका मंदा कांबळे, दिपाली खानोरकर, रजनी मुंघाटे, आशासेविका वर्षा मोहनकर, दुर्गा मांढरे, विजकन्या दिघोरे, राजू मेंढे, दिनेश तळेकर, सुनील आंबिलकर, मनोज देवतळे, जितेश दोरखंडे, कर्मचारी खुशाल कुलकुले, मुरली मलवंडे, माला खोकले, योगेश तळेकर व ग्रामस्थ प्रामुख्याने उपस्थित होते.

# १६९७ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर** : वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण १६९७ वाहन चालकांवर कारवाई करून १,९९,२५० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये २ प्रकरणात २ आरोपींवर कारवाई करून १,९४० रुपयांचा माल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये २ प्रकरणात २ आरोपींवर कारवाई करून ८०३० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.

# मातोश्री सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

■ **महासागर प्रतिनिधी कळमेश्वर, दि. ५ :**

विद्येची देवता मातोश्री सावित्रीबाई फुले यांची जयंती लुंबिनी बुद्ध विहार कळमेश्वर येथे भारती भारतीय बौद्ध महासभा तालुका कळमेश्वर तर्फे साजरी करण्यात आली.

विद्येची देवता मातोश्री सावित्रीबाई फुले यांची जयंती लुंबिनी बुद्ध विहार कळमेश्वर येथे भारती बौद्ध महासभा तालुका कळमेश्वर च्या वतीने जोशनाताई मंडपे माजी उपाध्यक्ष नगरपरिषद कळमेश्वर ब्राह्मणी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध, परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, मातोश्री सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास व तैलचित्रास पुष्पमाला जोशना मंडपे, संध्या उके, सूर्यवंशी, लता वानखेडे, कल्पनाताई मेश्राम, चव्हाण यांनी अर्पण करून अगरबत्ती, मेणबत्ती प्रज्वलित केली. जोशना मंडपे यांनी पंचशील ध्वजारोहण प्रभु कराडे यांनी वंदना घेऊन कार्यक्रमाचा प्रारंभ केला. या कार्यक्रमाचे प्रमुख विशेष अतिथी म्हणून महासागरचे जिल्हा प्रतिनिधी युवराज मेश्राम हे होते.

प्रास्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे कोषाध्यक्ष बोधाचार्य फकीरचंदजी गोंडाणे गुरुजी यांनी केले याप्रसंगी नगरपरिषद कळमेश्वर ब्राह्मणीचे नवनियुक्त सदस्य सुमेध भोसकर, सूर्यवंशी, संध्या उके, प्रणाली डोंगरे यांनी मातोश्री सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा ज्योत्सनाताई मंडपे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकून स्त्रीला समानतेच्या अधिकाराची



सुरुवात सावित्रीबाईने करून संपूर्ण महिला वर्गावर उपकार केलेत म्हणून प्रत्येक घरी सावित्रीबाई फुले यांची फोटो प्रत्येकाने आपल्या घरी लावावे या त्यांच्या वैचारिकतेने मार्ग चालण्याचे मार्गदर्शन केले.

संचालन भारतीय बौद्ध महासभा तालुका सचिव अरुण वाहने यांनी केले तर आभार प्रदर्शन राहुलजी वानखेडे जिल्हा माजी सरचिटणीस यांनी केले. या कार्यक्रमास दीपक मेश्राम, कल्पना मेश्राम व त्यांच्या परिवाराने अथक परिश्रम घेतले. भारतीय बौद्ध महासभा तालुका कळमेश्वर च्या वतीने जोशना मंडपे माजी उपाध्यक्ष नगरपरिषद कळमेश्वर ब्राह्मणी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध, परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, मातोश्री सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास व तैलचित्रास पुष्पमाला जोशनाताई मंडपे, यांच्या हस्ते पुष्प माला अर्पण करण्यात आली या कार्यक्रमाला प्रामुख्याने संध्याताई उके, सूर्यवंशी, लता वानखेडे, कल्पना मेश्राम, चव्हाण यांनी अर्पण करून अगरबत्ती, मेणबत्ती प्रज्वलित केली. जोशना मंडपे यांनी पंचशील ध्वजारोहण व प्रभुजी कराडे यांनी बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाचा प्रारंभ केला.

या कार्यक्रमाचे प्रमुख विशेष अतिथी म्हणून महासागरचे जिल्हा प्रतिनिधी व भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा प्रतिनिधी युवराज मेश्राम हे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे कोषाध्यक्ष बोधाचार्य फकीरचंदजी गोंडाणे गुरुजी यांनी केले. याप्रसंगी नगरपरिषद कळमेश्वर ब्राह्मणीचे नवनियुक्त सदस्य सुमेध भोसकर, सूर्यवंशी, संध्या उके, प्रणाली डोंगरे यांनी मातोश्री सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा ज्योत्सनाताई मंडपे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकून स्त्रीला समानतेच्या अधिकाराची सुरुवात सावित्रीबाईने करून संपूर्ण महिला वर्गावर उपकार केलेत म्हणून प्रत्येक घरी सावित्रीबाई फुले यांची फोटो प्रत्येकाने आपल्या घरी लावावे.

# महिला नायलॉन मांजा विक्रेत्यास अटक

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ५ :**

गुन्हे शाखा युनिट ५ च्या पथकाने गस्ती दरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारावर नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या एका महिलेस अटक केली. पोलिसांनी तिच्याकडून प्रतिबंधित मांजाच्या १७ चक्री जप्त केल्या. संगीता दीपक शाहू (५५) रा. निर्मलनगर, गोरेवाडा असे अटकेतील महिला आरोपीचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास युनिट ५ चे पथक मानकापूर ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान निर्मलनगर परिसरात राहणारी संगीता शाहू ही तिच्या घरूनच प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी संगीताच्या घरावर धाड टाकली. पंचासमक्ष तिच्या घराची झडती घेतली असता १७ चक्री नायलॉन मांजा मिळाला. पोलिसांनी २५,५०० रुपये किंमतीचा मांजा जप्त करून संगीताला अटक केली. तिच्या विरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील कार्यवाहीसाठी तिला मालासह मानकापूर पोलिसांच्या स्वाधिन केले. तिने मांजा कुठून आणला याचा शोध सुरू आहे.

# ४५ मीटर बो-स्ट्रिंग गर्डरचे सुरक्षित आणि यशस्वी प्रक्षेपण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**

नागपूर विभागातील आग्नेय मध्य रेल्वेच्या गति शक्ती युनिटने अभियांत्रिकी क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे आणि ताकद, सुरक्षितता आणि तांत्रिक कार्यक्षमतेचे उत्कृष्ट उदाहरण मांडले आहे.

आग्नेय मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक तरुण प्रकाश आणि नागपूरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली, मुंबई-हावडा मुख्य रेल्वे मागाअंतर्गत बकल-मुसरा विभागात लेव्हल क्रॉसिंग क्रमांक ४६८ वर निमार्णाधीन रोड ओव्हर ब्रिज साठी ४५ मीटर लांब आणि अंदाजे २६० टन वजनाच्या बो-स्ट्रिंग गर्डरच्या लॉंचिंगचे काम रविवार, ४ जानेवारी २०२५ रोजी यशस्वीरित्या पूर्ण झाले.



अप, डाउन आणि थर्ड रेल्वे लाईन्सवर नियोजित ट्रॅफिक ब्लॉक दरम्यान हे अत्यंत गुंतागुंतीचे आणि तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक काम केवळ १ तास १० मिनिटांत सुरक्षित आणि कार्यक्षमतेने पूर्ण करण्यात आले. ६०० टन वजनाच्या क्रॉलर-माउंटेड रोड क्रेनचा वापर करून गर्डर लॉंचिंग करण्यात आले. अप, डाउन आणि थर्ड रेल्वे लाईन्सवर एकूण २ तास ट्रॅफिक ब्लॉक आवश्यक होता.

नागपूर गति शक्ती युनिटचे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक अशोक कुमार सूर्यवंशी आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी संजय नागभिडकर यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण झाले. अभियांत्रिकीसह संबंधित विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# न.प. सार्वजनिक वाचनालय सुरू करा मोवाडच्या नागरिकांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी नरखेड, दि. ५ :**

मोवाड येथील नगरपरिषद लोकमान्य टिळक सार्वजनिक वाचनालय हे कोरोना काळापासून आज सरासरी पाच वर्षा पासून हे वाचानालय बंद अवस्थेत आहे हे वाचनालय नगरपरिषद लोकमान्य टिळक सार्वजनिक वाचनालय या नावाने चर्चेत असून केसरी वृत्तपत्र फाउंडेशन पुणे यानी या वाचनलया करीता दोन लाख अनुदान दिले होते आणि लोकमान्य टिळक नगरपरीषद सार्वजनिक वाचनालय म्हणून या नावाने नगरपरिषद कमिटीने ठराव घेऊन हे वाचनालय डॉ, आंबेडकर वार्ड क्र. ५ येथे सूरू केले.




परंतू आज घडीला हे वाचनालयाचे नावं नामोनिशाण मिटले असल्याचे चित्र दिसत आहे येथील इमारत धूळखात पडली आहे. हे वाचनालय नागरिकांसाठी तात्काळ सुरू करून वाचकांसाठी सर्वच वृत्तपत्र, मासिके, रोजगार समाचार, पूर्वी सारखे हे वाचनालय नगरपरिषदेने तात्काळ सुरु करावे अशी मागणी येथील असंख्य नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाला केली आहे.

हे वाचनालय आज पाच वर्षापासून नागरिकांच्या सेवेत नाही. अनेक वेळा नगरपरिषद प्रशासनाला अर्ज दिले अनेक वेळा वृत्तपत्राला बातमी छापून प्रशासनाला सूरू करण्यासाठी मागणी केली. परंतु प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. हे वाचननालय डॉ, आंबेडकर वार्ड क्र,पाच येथे केसरी वृत्तपत्र फाउंडेशन पुणे यांच्याकडून बांधून देण्यात आले असल्याने या सार्वजनिक वाचनालयाचा फायदा गोरगरीब नागरिकांना युवा वर्गाना व्हायला हवा. ही इमारत आज धूळखात पडली आहे आज हर गावामध्ये सार्वजनिक वाचनालय नागरिकांच्या सेवेत उपलब्ध आहे परंतु मोवाड सारख्या नगरपरिषद असलेल्या शहरात सार्वजनिक वाचनालय उपलब्ध नाही हि एक खेदाची बाब आहे. हे वाचनालय कोरोना काळापासून म्हणजे २०२० पासून बंद अवस्थेत आहे. ते आजही बंद अवस्थेत आहेत. नगरपरिषद प्रशासनाने हे वाचनालय तात्काळ सुरू करावे, अशी मागणी येथील असंख्य नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाला केली आहे.

# पोलीस रेजिंग डे सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांसाठी जनजागृती

■ **महासागर प्रतिनिधी कन्हान, दि. ५ :**

महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त २ ते ७ जानेवारी या कालावधीत साजरा करण्यात येणाऱ्या पोलीस रेजिंग डे सप्ताहाच्या निमित्ताने कन्हान पोलीस ठाण्याच्या वतीने विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सप्ताहाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण करणे, पोलीस दलाची कार्यपद्धती समजावून सांगणे तसेच पोलीस व नागरिक यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ करणे हा आहे.

या पार्श्वभूमीवर वच्छालागोपी पब्लिक स्कूल, कन्हान येथील विद्यार्थ्यांना कन्हान पोलीस ठाण्यात बोलावून विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागात कार्यरत असतानाही या शाळेने सीबीएसई बोर्डच्या शिक्षणात अल्प कालावधीतच उल्लेखनीय प्रगती साधली असून, शैक्षणिक गुणवत्तेसोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारी शाळा म्हणून तिची ओळख निर्माण झाली आहे.५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता झालेल्या या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक वैजयंती मांडवधरे यांनी विद्यार्थ्यांना पोलीस दलाचे



कामकाज प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगितले.

पोलीस स्टेशनची रचना, स्टेशन डायरीचे महत्त्व, विविध टेबलांवरील कामकाज, कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, जेलखान्याची माहिती, गुन्हेगारी तपासाची प्रक्रिया, चोर व संशयित यातील फरक याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच पोलिसांकडे उपलब्ध असलेली शस्त्रास्त्रे, शस्त्रसाठा, दंगल नियंत्रणासाठी वापरण्यात येणारी साधने, पोलिसांच्या सुरक्षिततेसाठी असलेली आधुनिक उपकरणे, शस्त्र वापराचे नियम व त्यामागील कायदेशीर बाबी विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आल्या. विद्यार्थ्यांसह उपस्थित शिक्षकांनाही पोलीस दलाची सामाजिक जबाबदारी, नागरिकांनी पोलिसांशी कसे सहकार्य करावे आणि कायद्याचे पालन का महत्त्वाचे आहे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.हा कार्यक्रम पोलीस विभागीय अधिकारी संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

यावेळी पीएसआय प्रवीण हारगुडे, रोशन बावनकर, सुनील कामडी, एकनाथ राठोड, मोहन शेळके, जैलाल सहारे यांनी शस्त्रांची माहिती देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मालखाना अधिकारी विना धुल, नरेश बाटवारई, अनिल यादव, अक्षय शिंदे मोरे, आतिश मानवटकर, आकाश शिरसाट, अनिल खान आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील बीना सिंग, त्रिवेणी सरोदे, अर्चना काठोके, प्रीती पटले, दीपशिखा सिंग, पौर्णिमा राप्तीवर, दीक्षा चुटे, ट्विंकल यादव, दिव्या लेकुरवाळे, राजश्री चिंचुळकर, प्रमोद गवई व अनिकेत नानोटे यांनी सहकार्य केले. तसेच पत्रकार सुनील सरोदे, कमल यादव व ऋषभ बावनकर उपस्थित होते.

पोलीस रेजिंग डे सप्ताहाअंतर्गत २ जानेवारीपासून विविध उपक्रम राबविण्यात येत असून, तारसा रोड चौक येथे पोलीस बँड पथकाचे संचालन करण्यात आले. तसेच साईबाबा आश्रम हायस्कूल, टेकाडी येथे विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, मोबाईलचे दुष्परिणाम, तसेच गुड टचबॅड टच बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. याचबरोबर वाहनचालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.पोलीस रेजिंग डे सप्ताहातील या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याची जाणीव वाढत असून, पोलीस व सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व विश्वास अधिक दृढ होत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

# पार्श्वनाथ पब्लिक शाळेत बालिका दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ५ :

द्रुगधामना येथील पार्श्वनाथ पब्लिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमीत्य बालिका दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. शिक्षणानेच स्त्री-पुरुषाचे जीवन उजडेल असा संदेश देणा ?्या महान समाजसुधारक आणि पहिल्या महिला शिक्षिकेच्या कायार्ला अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संचालक उदय टेकाडे, शाळेच्या प्राचार्य अन्नु पाल आणि उपप्राचार्य सुजाता गुरवे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सावित्रीबाईचा प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. शाळेच्या प्राचार्या अन्नु पाल यांनी प्रास्ताविक पर भाषण केले त्यांनी सांगितले की सावित्रीबाईंनी १८९८ मध्ये मुलींसाठी शाळा उघडून




शिक्षणाचे दार सर्वांसाठी खुले केले जे आजच्या काळातही प्रेरणादायी आहे. संचालक उदय टेकाडे यांनी शिक्षण हे समाजाला जोडते तर मुलींचे शिक्षण हे राष्ट्राचे भविष्य घडवते. शिक्षणासोबत सामाजिक समानतेच्या अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा सावित्रीबाईंनी दिला त्यांचे कार्य पुस्तके न राहता सत्यात उतरणारे आहे समाजाकडून दगड चिखल फेक सहन करावी लागली तरीही त्या थांबल्या नाही विधवा पुनर्विवाह बालहत्या प्रतिबंधक गृह अशी समाजासाठी केलेल्या कायार्ची आठवण करून दिली स्त्री शिक्षणाचे महत्त्व आणि समाजातील रुढी वादी विचारांना दिलेले आव्हाहन दलितांसाठी केलेले त्यांचे कार्य आजही समाजाला दिशा देते असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुलगी वाचवा देश वाचवा बेटी है तो कल है असे संदेश फलक विद्यार्थ्यांनी तयार केले होते तसेच सावित्रीबाई फुले :एक प्रेरणा या विषयावर नाटक सादर केले ज्यात विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील विविध घटकांचे प्रभावीपणे सादरीकरण केले. आलीना बेग, कार्तिक ठाकूर, अंशू किरमे, पलक प्रसाद, सलोनी मिरेकर, साक्षी चव्हाण, यशस्वी खोब्रागडे, सक्षम पाईकराव, लकी मस्के, एकता रंगारी, या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन शाळेच्या अध्यापिका रूपाली इंगळे यांनी तर आभार उपप्राचार्या सुजाता गुरवे यांनी मानले. कार्यक्रमाला पालक विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानदीप कॉन्व्हेंट व फार्मसी कॉलेजमध्ये स्व.डॉ. विनोदकुमार जयस्वाल यांना आदरांजली

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ५ :

स्थानिक ज्ञानदीप कॉन्व्हेंट, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स व फार्मसी कॉलेज, रामटेक येथे स्व. डॉ. विनोदकुमार जयस्वाल यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, सुप्रसिद्ध वक्ते डॉ. वेदप्रकाश मिश्रा, प्रख्यात बालरोगतज्ज्ञ डॉ. उदय बोधनकर, संस्थाध्यक्ष गजेंद्रकुमार चौकसे, उपाध्यक्षा अनिता जयस्वाल, सुष्मित मुजुमदार, ॲड. अनुप जयस्वाल, सचिव केवल हटवार, सहसचिव धनराज काठोके, यशवंत सहारे, डॉ. अब्दुल गणी, कॉन्व्हेंट व ज्युनिअर



कॉलेजच्या प्राचार्या डॉ. भुवनेश्वरी ठाकरे, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. अमित इंगळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यांनी स्व. डॉ. विनोद जयस्वाल यांनी ग्रामीण भागातील शैक्षणिक क्षेत्राला नवी दिशा व गती दिल्याचे नमूद केले.

डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी ग्रामीण भागात आरोग्यसेवा व शिक्षणाची भक्कम पायाभरणी करणारे स्व. डॉ. विनोदकुमार जयस्वाल यांचे कार्य अतुलनीय असल्याचे सांगितले.

# सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. ५ :

दमयंती देशमुख बी. एड व डी. एड. कॉलेजमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती व राजमाता जिजाऊ जयंती अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजऱ्या करण्यात आल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्या जयश्रीताई देशमुख यांनी भूषविले. संस्थेचे संस्थाध्यक्ष स्व. रविकांत रागीट यांच्या शैक्षणिक विचारांना अभिवादन करत कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

या प्रसंगी प्रा.किरण शेंद्रे यांनी मार्गदर्शन करत सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाच्या माध्यमातून घडवलेली सामाजिक क्रांती तसेच राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर केलेले संस्कार व राष्ट्रनिर्मितीतील योगदान यांचे महत्त्व विशद केले. शिक्षण, संस्कार व नेतृत्व ही समाज परिवर्तनाची त्रिसूत्री असून विद्यार्थ्यांनी ती आत्मसात करावी, असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. राजश्री माहुले यांनी केले. कार्यक्रमास प्रा. ऊर्मिला नाईक, प्रा. निकिता अंबादे, प्रा. सविता तायवाडे, प्रा. पारुल झाडे, प्रा. अनिल मिरासे, प्रा. विलास मडावी, प्रा. कला मेश्राम, प्रा. अंकित तडस, प्रा. धम्मदीप खोब्रागडे, प्रा. देवानंद नागदेवे, सुरेश कारेमोरे, गीता समर्थ, स्नेहा गाथे, सतीश कळंबे, अनिल बोरकर, वर्षा माहूरकर तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# अजीत पवार (राकाँ)चे नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ५ :

कामठी नगर परिषद निवडणूक २०२५ अंतर्गत शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट, कामठी शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट यांच्याकडून नवनिर्वाचित नगर सेवक आणि नगरसेवकांच्या निवडीबद्दल, सर्व संस्थापक सदस्य आणि ज्येष्ठ पक्ष कार्यकर्ते, कामठीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित नगर सेवक आणि नगरसेवकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

कामठीचे पदाधिकारी जमशेद भाई युसुफ भाई रा'मैया कोटपल्लीवार, इशाक कुरेशी, मनोज लखोटिया, कल्पना मेश्राम आणि इतर पक्ष पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत करुन अभिनंदन केले.

# बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहीम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर, बसस्थानक तसेच प्रशासकीय इमारतींमध्ये दर १५ दिवसांनी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गणेशपेठ बसस्थानकावर सुध्दा स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याने बसस्थानक स्वच्छ दिसणार आहे. यामुळे प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळार आहे. एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम एसटी महामंडळाने सुरू आहे. महामंडळाच्या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती, काच, शौचालये, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे, कार्यालयीन कक्ष आदींची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे.

## २०२७ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर :** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण २०२७ वाहन चालकांवर कारवाई करून २,९३,६४० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ७ व एनडीपीएस अन्वये २ अशा ९ प्रकरणात १० आरोपींवर कारवाई करून १,७९,४७० रुपयांचा माल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये १ प्रकरणात २ आरोपींवर कारवाई करून ५१४५ रुपयांचा माल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

## तडीपार चाकू गजाआड

**नागपूर :** बजाजनगर पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर सापळा रचून एका तडीपार गुंडाला विना परवानगी शहरात दाखल होऊन परिसरात फिरताना अटक केली. रोहित उर्फ चाकू धन्नू वर्मा (३१) रा. दंतेश्वरी वस्ती, बजाजनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. शनिवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास बजाजनगर पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान सावरकरनगर चौकातील येवले चिकन शॉपमध्ये तडीपार चाकू बसून असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस तेथे पोहोचताच चाकूने तेथून पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. ठाण्यात आणून त्याचा अभिलेख तपासला असता परिमंडळ क्र. १ च्या पोलिस उपायुक्तांनी त्याला १२ नोव्हेंबर २०२४ रोजी नागपूर जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केल्याचे पुढे आले. पोलिसांनी कलम १४२ अन्वये गुन्हा नोंदवून आरोपी चाकूला अटक केली. तो कोणत्या उद्देशाने शहरात परतला होता, याचा शोध सुरू आहे. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस त्याची कसून चौकशी करीत आहेत.

## वाहन चोरीत अट्टल घरफोड्या गजाआड

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट ६ च्या पथकाने वाहन चोरीच्या एका प्रकरणात अट्टल घरफोड्याला अटक केली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. तसेच मौदा आणि मध्यप्रदेशातील ४ घरफोडीच्या घटनांचा खुलासा केला. अभिलेख तपासला असता तो गिट्टीखदान ठाण्यात नोंद घरफोडीच्या गुन्ह्यात वॉन्टेड असल्याचे समोर आले. संघर्ष कैलास बागडे (१९) रा. खापरखेडा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. संघर्ष हा अभिलेखावरील सराईत घरफोड्या आहे. फिर्यादी किसन घुसाजी कापगते (७१) रा. डायमंड सोसायटी, मानेवाडा-बेसा रोड यांनी त्यांची एमएच-१२/पीडब्ल्यू-४४०४ क्रमांकाची दुचाकी गत २३ डिसेंबरच्या सकाळी ९ वाजता घरासमोर पार्क करून ठेवली होती. त्यानंतर २७ डिसेंबरच्या सायंकाळी ५ वाजता त्यांनी दुचाकी पाहिली असता तेथे नव्हती. २३ ते २७ डिसेंबरदरम्यान अज्ञात आरोपीने त्यांची दुचाकी चोरून नेली होती. त्यांच्या तक्रारीवरून अजनी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास युनिट ६ च्या पथकाकडूनही सुरू होता. तांत्रिक तपास आणि खबऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी आरोपी संघर्षला चोरीच्या वाहनाने फिरताना ताब्यात घेतले. चौकशीत त्याने कापगते यांची दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. त्याला अटक करून सखोल चौकशी केली असता संघर्षने मौदा हद्दित १ आणि मध्यप्रदेशातील सौंसर हद्दित घरफोडीचे ३ गुन्हे केल्याची माहिती दिली. पोलिसांनी त्याचा अभिलेख तपासला तो गिट्टीखदान हद्दितील घरफोडीच्या गुन्ह्यात पसार असल्याचे समोर आले. पोलिसांनी संघर्षला पुढील कार्यवाहीसाठी गिट्टीखदान पोलिसांच्या स्वाधिन केले. पुढील तपास गिट्टीखदान पोलिस करीत आहेत.

## ३.३३ लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर :** पारडी पोलिस ठाण्यांतर्गत अज्ञात आरोपीने घरफोडी करून रोख दीड लाख आणि दागिन्यांसह एकूण ३ लाख ३३ हजार ४०० रुपये किंमतीच्या मुद्देमालावर डल्ला मारला. या प्रकरणी पोलिसांनी शेख अफसर शेख अफजल (४३) रा. भारतीय लोककल्याण सोसायटी, नवीननगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत शुक्रवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास शेख अफसर घराला कुलूप लावून कुटुंबासह सासरी मुक्कामी गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख १.५० लाख व सोन्याचांदीचे दागिने असा ३,३३,४०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. दुसऱ्या दिवशी सकाळी अफसर घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# प्राध्यापिकेसह २ तरुणींशी गैरवर्तन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

वेगवेगळ्या घटनांमध्ये प्राध्यापिकेसह २ तरुणींशी गैरवर्तन करण्यात आल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. पहिल्या घटनेत सोशल मीडियाच्या माध्यमातून झालेली ऑनलाईन मैत्री महागात पडली. तर दुसऱ्या घटनेत भीमा कोरेगावला जाण्याच्या तयारीत असलेल्या तरुणीशी गैरवर्तन करण्यात आले. कपिलनगर आणि नंदनवन ठाण्यांतर्गत घडलेल्या या दोन्ही घटनांमध्ये विनयभंगाचा गुन्हा नोंदवत आरोपींना सूचना पत्र देऊन सोडण्यात आले आहे.

पहिली घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पीडित २७ वर्षीय तरुणी प्राध्यापिका आहे. काही दिवसांपूर्वी तिची ओळख इन्स्टाग्राम या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून प्रियांशू भौमिक (२२) याच्याशी झाली होती. ओळख वाढल्यानंतर दोघांमध्ये मोबाईल क्रमांकांची देवाणघेवाण झाली आणि फोनवर संभाषण सुरू झाले. मात्र, काही काळानंतर आरोपीचे वर्तन आक्षेपार्ह व त्रासदायक असल्याचे लक्षात येताच पीडितेने त्याच्यापासून दुरावा करीत बोलचाल बंद केली. यामुळे चिडून त्याने पीडितेला त्रास देण्यास सुरूवात केली. ३० डिसेंबर २०२५ ते १ जानेवारी २०२६ दरम्यान त्याने कॉलेजला ये-जा करत असताना पीडितेला रस्त्यात अडवले. जबरदस्तीने बोलण्याचा प्रयत्न केला. पीडितेने प्रतिसाद न दिल्याने चिडून शिविगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे भयभीत झालेल्या प्राध्यापिकेने नंदनवन पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

दुसरी घटना कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. २० वर्षीय पीडिता तिच्या बहिणीसोबत भीमा कोरेगाव येथे जाण्याची तयारी करत होती. या दरम्यान परिसरातच राहणारा आरोपी विनोद पृथ्वीराज रंगारी (४०) याने तिच्याशी गैरवर्तन करत विनयभंग केला. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

# भरदुपारी फ्लॅटचे कुलूप तोडले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत अज्ञात आरोपीने भरदुपारी फ्लॅटचे कुलूप तोडून रोकड व दागिन्यांसह एकूण १ लाख ९६ हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. विशेष म्हणजे चोराने केवळ तासात ही चोरी केली आणि पसार झाला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. पोलिसांनी माधव शंकर ढगे (४२) रा. पर्ल हेरीटेज सोसायटी, विहीरगावच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. ढगे यांचा हेरीटेज सोसायटीमध्ये चवथा माळ्यावर फ्लॅट आहे. गुरूवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास ते फ्लॅटला कुलूप लावून पत्नी व दोन मुलांसह पोलिओ लसीकरणासाठी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख ३० हजार आणि सोन्याचांदीचे दागिने १,९६,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

# माजी सैनिक आणि समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने शौर्य दिवस कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ५ :

कन्हान शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे माजी सैनिक आणि समता सैनिक दल कन्हान यांचा संयुक्त विद्यमाने गुरवार (दि.१) जानेवारी रोजी शौर्य दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित माजी सैनिक पंजाब पाटील, जयवंत गटपाडे यांचा हस्ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच बुद्धवंदना घेऊन शहिद सैनिकांच्या जयस्तंभाला मानवंदना देऊन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी जयवंत गटपाडे,




पंजाब पाटील, सम्राट पगारे यांनी भीमा कोरेगाव ऐतिहासिक लढाई बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात उपस्थित समाज बांधवांनी महार सैनिकांच्या समर्थनात विजयस्तंभाला मानवंदना देऊन लढाईत शहिद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजलि अर्पित करण्यात आली.या प्रसंगी माजी सैनिक जयवंत गटपाडे, सम्राट पगारे, विलास मेश्राम, पंजाब पाटील, नाकसेन मानकर, पदमाचंद पुंचभाई, इंद्रपाल कांबळे, दिलीप तायडे सह आदि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# दिलीप सिंग यांना अति विशिष्ट रेल सेवा पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

नागपूर विभागातील आग्नेय मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक दिलीप सिंग यांना रेल्वे सेवा क्षेत्रात त्यांच्या उत्कृष्ट, समर्पित आणि दूरदर्शी योगदानासाठी २०२५ च्या अति विशिष्ट रेल सेवा पुरस्कार साठी निवडण्यात



मूल्यांकनाशी संबंधित विविध अनुप्रयोगांचा विकास, तसेच भाडेपट्टा नसलेल्या महसूलात (एनएफआर) अभूतपूर्व वाढ सुनिश्चित करण्यासाठी त्यांच्या महत्त्वपूर्ण, प्रभावशाली आणि नाविन्यपूर्ण भूमिकेसाठी त्यांना हा प्रतिष्ठित

आले आहे. प्रवासी सेवांच्या गुणवत्तेत सतत सुधारणा, डिजिटल आणि पारदर्शक तिकीट प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी, महसूल संरक्षण, सुरक्षा आणि राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. ९ जानेवारी २०२६ रोजी साय. ५ वा. यशोभूमी द्वारका, नवी दिल्ली येथे आयोजित समारंभात हा सन्मान प्रदान करतील.

# शालेय विद्यार्थ्यांना मौदा पोलिसांकडून वाहतूक नियमांचे 'धडे'



■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. ५ :

> या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदे विषयक तसेच वाहतूक शिस्तीबाबत जागरूकता निर्माण होत आहे. हा उपक्रम विविध पुढे विविध शाळांमध्ये राबविला जाणार असून त्यामुळे भविष्यात जबाबदार नागरिक घडण्यास मदत होईल.
>
> **अतुल निंबार्ते, वाहतूक पोलीस शिपाई पोलिस स्टेशन मौदा**

शालेय विद्यार्थांनी जबाबदार व चांगला नागरिक बनावे या उद्देशाने मौदा पोलिसांकडून पोलिस स्टेशन येथे विशेष मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मौदा पोलिस स्टेशन येथे मौदा शहरातील शिर्डी साई पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांना पोलिस निरीक्षक सारीन दुर्गे यांनी वाहतूक नियमांबाबत माहिती देण्यासह व्यसनाधिनतेपासून दूर राहणे, सायबर गुन्हेगारी, सोशल मीडियाचा वापर आदी विषयांवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमादरम्यान मौदा वाहतूक पोलिस शाखेने विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची माहिती देत नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. पोलिस निरीक्षक सारीन दुर्गे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल किटे व वाहतूक शाखेचे पोलिस कर्मचारी यांच्या चमूने पार पडलेल्या कार्यक्रमादरम्यान वाहतूक नियमांबाबत माहिती देताना विभागातील कर्मचाऱ्यांनी दुचाकी चालवताना हेल्मेटचा नियमित वापर करण्याचे आवाहन केले. वाहन चालवताना मोबाईलवर बोलू नये, ट्रिपल सीट दुचाकी चालवू नये, दारू पिऊन दुचाकी चालवू नये, असे मार्गदर्शन केले. वाहन चालवण्याचे दुष्परिणाम, त्यावर करावयाची कारवाई याबाबत माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी पोलिस निरीक्षक सारीन दुर्गे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल किटे, वाहतूक पोलीस शिपाई अतुल निंबार्ते, शुभम ईश्वरकर पोलिस स्टेशन येथील कर्मचारी व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.

# ऑपरेशन अमानत अंतर्गत लॅपटॉप बॅग प्रवाशाला परत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळातील रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) ऑपरेशन अमानत अंतर्गत प्रवाशांच्या सेवेसाठी व सुरक्षिततेसाठी आपली तत्परता आणि प्रामाणिकपणा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. दिनांक 03 जानेवारी 2026 रोजी सुमारे 20:30 वाजता पुलगाव रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक 01 वरून गाडी क्रमांक 12136 नागपूरझपुणे एक्सप्रेस सुटल्यानंतर एक लॅपटॉप बॅग बेवारस अवस्थेत आढळून आली. आरपीएफ कर्मचाऱ्यांनी तत्काळ कारवाई करत सदर बॅग सुरक्षितरित्या आरपीएफ पोस्टवर आणली व नियमानुसार तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान बॅगेमध्ये लॅपटॉप, चार्जर, रोख रक्कम असलेले वॉलेट, ब्लूटूथ हेडफोन तसेच ओळखीसंबंधी कागदपत्रे आढळून आली.

# अव्हेल कॉन्व्हेंटमध्ये दोन दिवसीय विज्ञान कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ५ :

परीक्षा जवळ येत असताना विद्यार्थ्यांवरील वाढता मानसिक ताण आणि विषयांची क्लिष्टता कमी करण्याच्या उद्देशाने भारतीय शिक्षण मंडळ व राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरी यांच्या संयुक्त विद्यमाने एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. अव्हेल कॉन्व्हेंट हायस्कूल, दाभा येथील विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय एक्झाम सेंट्रिक कॉन्सेप्ट बिल्डिंग सेशन्स तसेच भारतीय शिक्षण मंडळ परिचय सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



प्रयोगांतून उलगडली विज्ञानाची गुपिते २६ व २७ डिसेंबर रोजी पार पडलेल्या या उपक्रमात एकूण पाच सत्रांचे आयोजन करण्यात आले. परीक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या विज्ञान विषयातील संकल्पनांवर या सत्रांमध्ये विशेष भर देण्यात आला. प्रॅक्टिकल बेस्ड लर्निंग ही या कार्यशाळेची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली.

राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरीच्या अनुभवी प्राध्यापकांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर न थांबता प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून कठीण संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शंका दूर होऊन त्यांचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढला.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थी व शिक्षकांना भारतीय शिक्षण मंडळाच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देण्यात आली. शिक्षण हे केवळ परीक्षाभिमुख न राहता अनुभव, संस्कार आणि सर्वांगीण विकासाशी जोडलेले असावे, असा विचार तज्ज्ञांनी मांडला. भारतीय शिक्षण परंपरेत अनुभवाधारित ज्ञानाला असलेले महत्त्व आधुनिक शिक्षणात प्रयोगांच्या माध्यमातून पुढे नेण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

हे आयोजन भारतीय शिक्षण मंडळाचे विदर्भ प्रांत अध्यक्ष डॉ. अखिलेश पेशवे आणि राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरीच्या संचालिका डॉ. सीमा उबले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. संघटनात्मक पातळीवर डॉ. मंगेश ठाकरे, प्रो. किशोर वाघमारे, डॉ. नीतू कपूर आणि कार्तिक जी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शैक्षणिक सत्रे डॉ. गोविंद लखोटिया यांच्या नेतृत्वाखाली एकता बागरे, राणी दुबे, सोनाली देशपांडे आणि शिखा व्यास यांनी अत्यंत प्रभावीपणे सादर केली.

**विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

शाश्वत बहुउद्देशीय शिक्षण संस्थेद्वारे संचालित अव्हेल कॉन्व्हेंट शाळेच्या मुख्याध्यापिका कोमल हाडगे यांच्या सकारात्मक पुढाकारामुळे विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ घेता आला. प्रयोगांच्या माध्यमातून शिकल्यामुळे परीक्षेची भीती कमी झाली असून विषय अधिक सोपा वाटू लागल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. या दोन दिवसीय कार्यशाळेने शिक्षणात भारतीयत्व आणि प्रायोगिक शिक्षण यांचा आदर्श वस्तुपाठ सादर केल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# मतदान अधिकार रथ यात्रेने शहरात जनजागृती

## स्वीप अंतर्गत शहरातील १० झोनमध्ये मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

सजग नागरिक, मतदार करा, नागपूरच्या विकासासाठी मतदान करा, महिला मतदान, सक्षम लोकशाही, अशा घोषणा देत आज (ता. ५) स्वीप कार्यक्रमाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेने राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) सहकार्याने आयोजित केलेल्या मतदार अधिकार रथ यात्रेने संपूर्ण शहरात मतदारांमध्ये जनजागृती केली. महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांनी झेंडा दाखवून या यात्रेला महापालिका मुख्यालयातून शुभारंभ केला.




मतदार जनजागृतीसाठी आयोजित केलेल्या या मतदार अधिकार यात्रेच्या शुभारंभाला अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., उपायुक्त व स्वीपच्या नोडल अधिकारी डॉ. रंजना लाडे, उपायुक्तमंगेश खवले, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, शिक्षणाधिकारी साधना सयाम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, क्रीडा अधिकारी पियूष अंबुलकर, स्वीप समन्वयक डॉ. सुशांत चिमणकर उपस्थित होते.

आगामी नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, यासाठी महानगरपालिका प्रशासनातर्फे शहरातील प्रत्येक झोनमध्ये मतदान अधिकार रथ यात्रा काढण्यात आली व मतदारांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच मतदार नोंदणीसाठी लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली. त्याचप्रमाणे या निवडणुकीत बहुसदस्यीय निवडणूक प्रक्रियेत कसे मतदान करावयाचे, याबद्दल मतदारांना माहिती देण्यात आली. हा उपक्रम सर्व झोनमध्ये विविध भागांमध्ये येत्या ११ जानेवारीपर्यंत सतत सुरू राहणार आहे.

यात मतदार अधिकार रथ यात्रेत शहरातील अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, वसंतराव नाईक शासकीय कला व सामाजिक विज्ञान संस्था तसेच हिस्लॉप महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन मतदारांमध्ये जनजागृती केली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी वसंतराव नाईक शासकीय कला व सामाजिक विज्ञान संस्थेचे डॉ. अनिल बनकर, अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालयाचे डॉ. मनोज मडावी व डॉ. मुरलीधर वाकोडे व हिस्लॉप महाविद्यालयाचे डॉ. मिलिंद घाटे यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी मतदारांमध्ये जनजागृती केली.

### वाद्यवृंदा कडून देशभक्ती गीतांची धून

मतदार अधिकार रथ यात्रेच्या शुभारंभाच्या वेळी महापालिका शाळांच्या शिक्षकांनी अग्निशमन दलाच्या बँडच्या सहाय्याने देशभक्ती गीतांची धून वाजवून वातावरण देशभक्तीमय केले. या वाद्यवृंदात प्रकाशचंद कलसिया, कमलाकर मानमोडे, अग्निशमन दलाची इशिका राऊत व आकाश श्रीरामे यांचा समावेश होता.

मतदान अधिकार रथ यात्रा प्रत्येक झोनमध्ये विविध भागातून फिरून जनजागृती केली. यासाठी प्रत्येक झोनसाठी एका सन्मवयकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात लक्ष्मीनगर झोनसाठी अर्चना लांडे, धरमपेठ झोनसाठी डॉ. अंकित पुसदकर, हनुमाननगर झोनमध्ये मतदान अधिकार रथ यात्रेचे समन्वयक म्हणून पूर्वेश फटिंग, धंतोली झोन साठी नितीन कराळे, नेहरूनगर झोनसाठी डॉ. संजय सिंगनजुडे, गांधीबाग झोनमध्ये डॉ. मिलिंद घाटे, सतरंजीपुरा झोनची जबाबदारी डॉ. मनोज मडावी, लकडगंज झोनमधील जबाबदारी डॉ. दिनेश कवाडे, आशीनगर झोनची जबाबदारी डॉ. रजनी हारोडे व मंगळवारी झोनमधील मतदान अधिकार रथ यात्रेच्या समन्वयकाची जबाबदारी डॉ. संध्या फटिंग यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. मतदार अधिकार यात्रेच्या सुरुवातीच्या अगोदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सर्व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या हातात मतदानासाठी जनजागृती करणारे फलक होते. मतदार अधिकार रथाला डिजीटल डिस्प्ले बोर्ड लावले होते. यात मतदानासाठी विविध घोषणा दिल्या जात होत्या. रस्त्याने जाणाऱ्या या मतदार अधिकार रथाकडे मतदारांचे लक्ष वेधून घेतले जात होते.

# बिल्डरला २८ लाखांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास ५ टक्के नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ठकबाज तरुणाने बांधकाम व्यावसायिकाला २८ लाख ९ हजार रुपयांनी गंडा घातला.

### आंतरराष्ट्रीय शेअर बाजारात ट्रेडिंगची थाप

वंजारी यांनी ६.५० लाख रुपयांचे खासगी फायनान्सकडून कर्ज घेतले. याशिवाय त्यांचे नातेवाईक विजय निखाडे यांनीही कर्ज घेऊन प्रणयला गुंतवणुकीसाठी पैसे दिले. त्याचे काही हप्ते प्रणयने दिल्यावर अचानक ते देण्यास बंद केले. त्याची विचारणा केली असता, त्याने निर्विघ्नम नावाची कंपनी सुरू करून त्यातून बीटकॉईन, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शेअर बाजारात ट्रेडिंग करण्यास सुरुवात केल्याची माहिती दिली. तसेच त्यात सर्व नातेवाईकांच्या पैशांची गुंतवणूक करीत चांगला नफा मिळवीत असल्याचे सांगितले.

याप्रकरणी अजनी पोलिसांनी जितेंद्र मनोहर वंजारी (५३) रा. विश्वकर्मानगर यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. प्रणव राजू नरडे (३४) रा. जयस्वाल कॉलनी, सिंदेवाही, चंद्रपूर असे आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जितेंद्र वंजारी हे २०१९ ला पत्नीसह काही दिवस रघुजीनगर येथील जीवनविहार कॉलनीत वास्तव्यास होते. यादरम्यान शेजारी असलेल्या प्रणवची आई नीता राजू नरडे (५२) यांच्याशी त्यांची ओळखी झाली. त्यांना प्रणव आणि पारस अशी दोन मुले आहेत. काही महिन्यांनी ते कॉलनी सोडून दत्तात्रयनगर येथे वास्तव्यास गेले. त्यानंतर काहीच दिवसांनी वंजारी यांना प्रणव याचा फोन आला. त्याने शेअर बाजारचे शिक्षण घेतले असून शेअर बाजारात गुंतवणूक करीत बराच नफा कमावल्याची बतावणी केली. तसेच अधिक नफा कमावण्यासाठी त्याला पैशांची कमतरता पडत असून जर त्यांनी त्याच्याकडे गुंतवणूक केली तर ५ टक्के नफा देईल असे आमिष दाखविले. त्याच्यावर विश्वास ठेवून वंजारी यांनी २०२० मध्ये त्याच्याकडे १ लाख रुपयांची गुंतवणूक केली. तो दरमहा ५ हजार रुपये परतावा त्यांना देऊ लागला. काही महिन्यांनी त्याने वंजारी यांना सिबिल स्कोर चांगला असल्याने २ टक्क्याने कर्ज घेऊन ५ टक्के नफा घेण्यास सांगितले.

# राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत आरुष गेडाम यांचे यश



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

जैन कलार समाज भवन रेशीमबाग चौक, उमरेड रोड येथे नुकतीच राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. यास्पर्धेत भद्रावती (चंद्रपूर) येथील आरुष रवी गेडाम यांनी अवघ्या ६ मिनिटे ४१ सेकंदात १०० पैकी १०० प्रश्न अचूक सोडवत चॅम्पियन होण्याचा मान मिळवला.

या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांमधून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. छत्तीसगड, गोवा, पुणे, भंडारा, नागपूर, भुसावळ, यवतमाळ, एरंडोल, चंद्रपूर, भद्रावती, आग्रा, दिल्ली, जबलपूर, मुंबई, पालघर तसेच मध्य प्रदेश येथील विद्यार्थ्यांनी आपल्या गणनाशक्तीची कसोटी घेतली. स्पर्धेचे उद्घाटन विशाल कोहिटे, विवेक आगसे, सफिर अहमद आणि राजेश मसुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांची वेगवान गणनाशक्ती, अचूकता आणि एकाग्रता यांचे मूल्यमापन करण्यात आले.

आरुष रवी गेडाम यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पालक, शिक्षक आणि आयोजकांकडून त्याचे अभिनंदन करण्यात आले असून, त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या यशामुळे भद्रावती (चंद्रपूर) तसेच नागपूर शहराचे नाव राष्ट्रीय स्तरावर उजळले आहे. आयोजन अबॅकस अकादमी, नागपूर यांनी केले तर संचालन व आभार दीक्षा खानोरकर यांनी मानले.

# नागपूर प्लॉगर्सने राबविली स्वच्छता मोहीम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

प्लॉगर्स टीम दर रविवारी सकाळी स्वच्छता आणि प्लॉगिंग मोहिमेचे आयोजन करते, ज्यामुळे स्वतःची तंदुरुस्ती आणि पर्यावरण जागरूकता वाढवते. आजच्या मोहिमेत, स्वयंसेवकांनी अंबाझरी तलावाभोवतीचा परिसर स्वच्छ केला आणि गोळा केलेला कचरा नागपूर महानगरपालिका आणि अधिकृत पुनर्वापरकर्त्यांना सुपूर्द केला.



गेल्या पाच वर्षांपासून, नागपूर प्लॉगर्स स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संरक्षणाबद्दल सतत जागरूकता निर्माण करत आहे. या सततच्या प्रयत्नातून प्रेरित होऊन, अनेक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे आणि ते या चळवळीत सामील होत आहेत.

या प्रसंगी, टीम लीडर सूरज श्रीवास्तव यांनी नागपूरच्या नागरिकांना रविवारच्या स्वच्छता मोहिमेत सहभागी होण्याचे आणि स्वच्छ आणि हिरवे नागपूर निर्माण करण्यासाठी आवाहन केले.

# महिला गांजा विक्रेत्यास अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

पारडी पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर भांडेवाडी परिसरात धाड टाकून अमली पदाथार्ची तस्करी व विक्री करणाऱ्या महिलेला अटक केली. पोलिसांनी तिच्याकडून दीड किलो गांजाही जप्त केला. रूदना जुगराज सोनार (५०) रा. उडिया मोहल्ला, गोंडपुरा, भांडेवाडी असे अटकेतील महिला आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रूदना गांजा विक्रीत सक्रीय असून तिने घरामध्ये मोठ्याप्रमाणात गांजा साठवून ठेवला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी रूदनाच्या घरावर धाड टाकली. झडतीदरम्यान तिच्या घरून १ किलो ४९६ ग्रॅम गांजा जप्त केला. या गांजाची किंमत अंदाजे २२ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. पोलिसांनी तिच्याकडून गांजाची विक्री करून मिळवलेले ६,८०० रुपयेही जप्त केले. चौकशीत रूदनाने माल शेजारी राहणाऱ्या रुपेश कुंदन लोखंडे (३३) याच्याकडून खरेदी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी या प्रकरणात रुपेश यालाही आरोपी करून त्याच्या घराची झडती घेतली असता ४५ हजार रुपये किंमतीचा २ किलो ९३८ ग्रॅम गांजा मिळाला.

# वाहन चोर गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने हुडकेश्वर ठाण्यात नोंद वाहन चोरीचा छडा लावून आरोपीस अटक केली. प्रविण मुकुंद गजभिये (३७) रा. भगतसिंग वॉड, नवीन टाकळी, भंडारा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून चोरीचे वाहनही जप्त करण्यात आले.

हनुमाननगर परिसरात राहणारे फिर्यादी रवींद्र नामदेव जवंजाळ (६०) यांनी गत ३० नोव्हेंबरच्या सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास त्यांची एमएच-४९/एन-३९८५ क्रमांकाची दुचाकी बेसा मार्गावर घोगली परिसरातील विंध्यावासीनी लॉन येथे पार्क केली होती. या दरम्यान अज्ञात आरोपीने त्यांची दुचाकी चोरून नेली. सायंकाळी ५ वाजता ते कार्यक्रम आटोपून लॉनच्या पार्किंगमध्ये आले असता त्यांची दुचाकी गायब होती. त्यांच्या तक्रारीवरून हुडकेश्वर पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला होता.

# शालार्थ आयडी घोटाळा

### नागपूर विभागात ६३२ नावे

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ५ :

महाराष्ट्र सरकारने शालार्थ वेतन प्रणाली व शिक्षक भरती घोटाळ्याची चौकशी अधिक तीव्र केल्याच्या पार्श्वभूमीवर, नागपूर विभागात एकट्या चौकशीत ६३२ जणांची नावे समोर आली असली तरी मोठ्या प्रमाणावर अटक होण्याची शक्यता कमी असल्याचे अधिकारी व कायदा तज्ज्ञांचे मत आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ही संख्या प्रशासकीय तपासणीदरम्यान समोर आलेल्या नावांची असून फौजदारी खटल्याला सामोरे जाणाऱ्या आरोपींची अंतिम यादी नाही.

चौकशीशी संबंधित सूत्रांनी सांगितले की या अहवालांमध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, लिपिकीय कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील अधिकारी अशा विविध घटकांचा समावेश आहे, ज्यांच्या नियुक्ती किंवा वेतन नोंदी अनियमित मार्गाने प्रक्रिया झाल्याचे आढळले. मात्र, बनावट कागदपत्रे, प्रणालीचा गैरवापर किंवा ठोस आर्थिक व्यवहार (मनी ट्रेल) यांचे स्पष्ट पुरावे असलेल्या मर्यादित प्रकरणांमध्येच फौजदारी कारवाई होण्याची शक्यता आहे.

चौकशीत सहभागी असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की केवळ चौकशी अहवालात नाव आल्याने फौजदारी जबाबदारी निश्चित होत नाही. अटक करण्यासाठी हेतू, बनावट प्रक्रियेत सक्रिय सहभाग आणि वैयक्तिक लाभ यांचे पुरावे आवश्यक असतात. हे नसल्यास न्यायालयात खटला टिकणे कठीण असते,ह्व असे एका अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान, शिक्षण क्षेत्रातील निरीक्षक आणि शिक्षक संघटनांनी शाळांतील मुख्याध्यापकांमध्ये वाढत चाललेल्या भीतीच्या वातावरणाकडे लक्ष वेधले आहे. त्यांच्या मते, तात्काळ अटकेची भीती प्रत्यक्षात वाढवून सांगितली जात असून ती अनेकदा अनौपचारिक इशारे व कायदेशीर सल्लूयांच्या माध्यमातून पसरवली जात आहे. या संघटनांचा आरोप आहे की चौकशीभोवती असलेल्या अनिश्चिततेचा फायदा घेत काही वकील व खालच्या स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणेतील मध्यस्थ प्राचार्य व मुख्याध्यापकांना त्रास देण्यासाठी किंवा आर्थिक तडजोडींसाठी दबाव टाकत आहेत. यातील अनेकजण दीर्घकाळापासून सामाजिक व व्यावसायिक प्रतिष्ठा लाभलेले शिक्षक आहेत.

सरकारची भूमिका सार्वजनिक जबाबदारी आणि प्रशासकीय स्थैर्य यांचा समतोल राखण्याची आहे. वेतन नोंदी स्वच्छ करणे, झालेला आर्थिक तोटा वसूल करणे आणि प्रशासनाला इशारा देणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे दिसते; लाभार्थ्यांवर मोठ्या प्रमाणावर फौजदारी कारवाई करणे हा मुख्य हेतू नाही.

# रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती



## महाविद्यालयीन विद्यार्थीनींनी साकारल्या मनोवेधक रांगोळ्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

मनपाच्या मतदान जनजागृती स्वीप अभियानांतर्गत प्राचार्य अरुणराव कलोडे महाविद्यालयात मतदान जागृतीपर रांगोळी स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत या महाविद्यालयाची कु. प्रणाली रामटेके हिने पहिला क्रमांक पटकाविला.

मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या नेतृत्वात स्वीपच्या नोडल अधिकारी डॉ. रंजना लाडे यांच्या देखरेखीत मतदान जनजागृती केली जात आहे.

प्राचार्य डॉ .देवाशिष भौमिक यांच्या मार्गदर्शनात मतदान जनजागृती रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील बी.ए, बी.कॉम, बी.एस.सी. पदवी अभ्यासक्रमातील सोळा विद्याथीर्नींनी सहभाग नोंदविला. या विषयाला अनुसरून विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूतीर्ने मतदान जागृती विषयी कल्पनेतून रांगोळीतून साकारल्या.

या रांगोळी स्पर्धेत बी.ए. च्या पहिल्या वषार्ची विद्यार्थिनी प्रणाली रामटेके हिने प्रथम क्रमांक पटकाविला. बी. कॉम अंतिम वर्षाच्या कु. पायल सांबरे व कु. अर्चना यादव यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक प्राप्त केला. प्रोत्साहनपर पारितोषिक बी. ए. द्वितीय वषार्ची कु. अश्विनी ठाकरे पारितोषिक घोषित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संपूर्ण शिक्षक वृंदाचे सहकार्य लाभले संपूर्ण माहिती आपणास सादर .

या स्पर्धेत कु. सिद्धी मेश्राम, कु. निशा अग्रे, सर्वज्ञ शिंदे, अर्पिता थूल, कु. पूजा राहिले, तनुश्री खंडागळे, कु. ऋतुजा गेडाम, कु. मीनाक्षी भुरे, कु. काजल, कु. हर्षाली संयम, कु. पल्लवी रंगले व कु. शुभांगी चक्रे यांनी सहभाग नोंदविला.

# घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने शहर व ग्रामीण भागात घरफोडी करणाऱ्या टोळीचा पदार्फाश करून २ जणांना अटक केली. चौकशीत आरोपींकडून तब्बल ९ गुन्हे उघडकीस आले. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरीचा ४ लाख १९ हजार ७५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. साहिल धीरज लांजेवार (१९) रा. आंबेडकरनगर, वाडी आणि ऋषिकेश उर्फ ऋषी गणेश मानकर (२१) रा. वॉर्ड क्र. १, कन्हान-कांद्री अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पोलिस त्यांचे फरार साथीदार अभिजित नितनवरे (२२) रा. जरीपटका, ऋषी नागदेवे (२२) रा. समतानगर-कपिलनगर, सागर, पियूष आणि अल्पवयीनचा शोध घेत आहेत.

गोरेवाडाच्या नेताजी हाऊसिंग सोसायटीत राहणारे रितेश राममणी शुक्ला (४३) यांच्या वडिलांची पुण्यतिथी होती. त्यासाठी ते घराला कुलूप लावून कुटुंबासह मध्यप्रदेशातील रीवा येथील मुळगावी गेले होते. ११ डिसेंबरच्या रात्री ३ वाजताच्या सुमारास अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख ६५ हजार, सोन्याचांदीचे दागिने, कारची चावी व इतर साहित्य असा एकूण ५ लाख ७४ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. त्यांच्या तक्रारीवरून मानकापूर पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट २ चे पथकही करीत होते. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता साहिल व ऋषिकेशची ओळख पटली. पोलिसांनी त्यांचा पत्ता शोधण्यासाठी खबऱ्यांना कामावर लावले. साहिल वाडीच्या दख्खणी मोहल्ला येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने ऋषिकेश मानकर, अभिजित, ऋषी, सागर, पियूष व अल्पवयीन आरोपीसोबत मिळून गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी ऋषिकेश यालाही अटक केली. मात्र इतर आरोपी त्यांच्या हाती लागले नाही.

# सुगत नगर रोडवर कचऱ्याचे साम्राज्य




महासागर प्रभाग वार्ता

■ प्रभू गजभिये, नागपूर, दि. ५ :

प्रभाग क्रमांक २ अंतर्गत येणाऱ्या इंदोरा येथील कामठी रोडपासून सुगत नगरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने परिसरात भीषण दुर्गंधी पसरली आहे. या मार्गालगत ग्रामीण पोलीस मुख्यालय तसेच ग्रामीण आरटीओ कार्यालय असल्यामुळे दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी, कर्मचारी, महिला व ज्येष्ठ नागरिकांची वर्दळ असते.

सुगत नगर रोड हा चॉक्स कॉलनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलनी, ठवरे कॉलनी, नागसेन नगर व सुगत नगर येथील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. मात्र रस्त्याच्या कडेला टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरात माशा व डासांचा प्रचंड प्रादुर्भाव झाला असून संसर्गजन्य आजार पसरण्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.

या अस्वच्छतेमुळे नागरिकांना ये-जा करताना त्रास सहन करावा लागत असून विद्यार्थ्यांच्या व महिलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

याबाबत अनुप राहाटे, अंबरीश रामटेके, संदीप चौधरी, परेश गजभिये, प्रशांत साखरे, बबन बोदिले, शैलेश बोदिले, प्रमोद जांभूळकर, सतीश जांभूळकर व राजेश पांडे यांनी एकत्रितपणे प्रशासनाकडे तातडीने कचरा उचलणे, नियमित स्वच्छता मोहीम राबवणे व कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली आहे.